ISSN 2278-8808 SJIF 2014 = 4.889
An International Peer Reviewed & Referred
SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

# माध्यमिक शिक्षकांच्या बी.एड. महाविद्यालयांकडून असणाऱ्या अपेक्षांचा अभ्यास

**डॉ. बी. डी. माशेरे**
*सी.के.गोयल महाविद्यालय दापोडी, पुणे*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

### १.१ पार्श्वभूमी

माध्यमिक शिक्षक होण्यासाठी संबंधित विषयामध्ये पदवी आणि बी.एड. कोर्स करणे अनिवार्य आहे. मागील वर्षी एक वर्षाचा बी.एड. कोर्स करावा लागत होता. एक वर्षाचा कालावधी शिक्षक होण्यासाठी अत्यंत कमी समजा जात असे. इतक्या कमी कालावधीमध्ये सैद्धांतिक विषय, अनेक प्रात्यक्षिके, सरावपाठ, छात्रसेवाकाला, सांस्कृतिक कार्यक्रम, समाजसेवा अशे विविध कार्यक्रम अत्यंत धावपळीमध्ये करावे लागत असत. याचाच विचार करता अनेक वर्षापासून अशी मागणी होत होती की बी.एड. अभ्यासक्रम दोन वर्षाचा होणे आवश्यक आहे. अशा आशयाच्या शिफारीशी देखील विविध आयोगाने केलेल्या होत्या. अखेर शैक्षणिक वर्ष २०१५–१६ पासून या मागणीला मूर्त रूप आले आणि शिक्षक प्रशिक्षणाचा कालीवधी दोन वर्षाचा करण्यात आला आहे. कालावधीमध्ये झालेल्या या बदलाबरोबरच महाविद्यालय आणि शिक्षक तसेच विद्यार्थी यासमोर अनेक आव्हाने उभी राहिली आहेत.

कोणताही अभ्यासक्रम किती यशस्वी झाला याचे मूल्यमापन तो अभ्यासक्रम ज्या उद्दीष्टांसाठी निश्चित केला आहे ती उद्दिष्टे प्राप्त झाली आहेत का यावरून करता येते. माध्यमिक शिक्षक होण्यासाठी निर्माण केलेल्या या अभ्यासक्रमाकडून, सद्या माध्यमिक शिक्षक म्हणून कार्यरत असलेल्या अध्यापकांच्या कोणत्या अपेक्षा आहेत या अपेक्षांचा अभ्यास प्रस्तुत संशोधनातून करण्यात आला आहे.

### १.२संशोधनाची गरज व महत्त्व

- ज्यांच्यासाठी बी.एड. कोर्स राबविला जातो त्यांच्या या कोर्सपासून अपेक्षा जाणून घेण्यासाठी सदर संशोधन होणे आवश्यक आहे.
- भविष्यात बी.एड. अभ्यासक्रमास दिशा देण्यासाठी या संशोधनामार्फत जाणून घेतलेल्या अपेक्षांचा लाभ होणार आहे.

### १.३समस्या विधान

माध्यमिक शिक्षकांच्या बी.एड. महाविद्यालयांकडून असणाऱ्या अपेक्षांचा अभ्यास करणे.

### १.४कार्यात्मक व्याख्या

**१. बी.एड. महाविद्यालये**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी सलग्न बी. एड.महाविद्यालये ज्यामध्ये नियमित बी.एड. अभ्यासक्रम राबविला जातो.

**२. माध्यमिक शिक्षक**

ज्या शिक्षकाने बी.एड. अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर आठवी ते दहावी माध्यमिक शिक्षक म्हणून किमान पाच वर्षे सेवा केली आहे तो म्हणजे प्रस्तुत संशोधनासाठी माध्यमिक शिक्षक आहे.

**३. अपेक्षांचा अभ्यास**

बी.एड. अभ्यासक्रमांतर्गत दिले जाणारे अध्यापनाचे प्रशिक्षण, करून घेतली जाणारी प्रात्यक्षिके आणि शिकविल्या जाणाऱ्या सैद्धांतिक विषयाबद्दच्या अपेक्षा म्हणजे अपेक्षांचा अभ्यास.

**१.५उद्दिष्टे**

१. माध्यमिक शिक्षकांच्या बी.एड्. महाविद्यालयांकडून असणाऱ्या अपेक्षांचा अभ्यास करणे.

**१.६संशोधन प्रश्न**

माध्यमिक शिक्षकांच्या बी.एड. महाविद्यालयांकडून कोणत्या अपेक्षा आहेत?

**१.७गृहीतके**

१. वर्ष २०१५—१६ पासून बी. एड. कोर्स २ वर्षाचा करण्यात आला आहे.
२. माध्यमिक शिक्षक होण्यासाठी २ वर्षाचा बी.एड. अभ्यासक्रम पूर्ण करणे आवश्यक आहे.
३. माध्यमिक शिक्षकांच्या बी.एड. कोर्सकडून काही अपेक्षा असतात.

**१.८व्याप्ती व मर्यादा**

**१.८.१ व्याप्ती**

१. सदर संशोधन पुणे शहर या भौगोलिक क्षेत्राशी संबंधित आहे.
२. सदर संशोधन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न बी.एड. अभ्यासक्रमाशी संबंधित आहे.
३. सदर संशोधन हे माध्यमिक शिक्षकांच्या अपेक्षांशी संबंधित आहे.

**१.८.२ मर्यादा**

१. सदर संशोधनात माहिती संकलन करण्यासाठी प्रमाणित माहिती संकलन साधन उपलब्ध नव्हते.
२. सदर संशोधनामध्ये माहिती संकलनार्थ वापरण्यात आलेले साधन संशोधक निर्मित आहे.
३. सदर संशोधनामध्ये माहिती संकलनार्थ वापरण्यात आलेले साधन प्रमाणित करण्यात आले नाही.
४. सदर संशोधनाचे निष्कर्ष संशोधकाने तयार केलेल्या माहिती संकलन साधनाला नमुना प्रतिसादकांनी दिलेल्या प्रतिसादकावर अवलंबून आहेत.
५. सदर संशोधन हे शैक्षणिक वर्ष २०१५—१६ शी संबंधित आहे.

**१.९संशोधन पद्धती**

सदर संशोधन करण्यासाठी शालेय सर्वेक्षण पद्धतीचा वापर करण्यात आला.

**१.१० नमुना निवड**

**१.१०.१ जनसंख्या**

पुणे शहरातील बी.एड. झालेले आणि बी.एड. पूर्ण केल्यानंतर किमान ५ वर्षे माध्यमिक शाळेमध्ये इयत्ता आठवी ते दहावीच्या वर्गांना अध्यापन करणारे शिक्षक ही सदर संशोधनाची जनसंख्या आहे.

**१.१०.२ नमुना**

पुणे शहरातील बी.एड. झालेले आणि बी.एड. पूर्ण केल्यानंतर किमान ५ वर्षे माध्यमिक शाळेमध्ये इयत्ता आठवी ते दहावीच्या वर्गांना अध्यापन करणाऱ्या शिक्षकांमधून २० शिक्षकांची निवड असंभाव्यता आधारित प्रासंगिक नमुना निवड पद्धतीने सदर संशोधनासाठी नमुना म्हणून करण्यात आली.

**१.११ माहिती संकलनाची साधने**

प्रस्तुत संशोधनासाठी माहिती संकलनाचे साधन म्हणून प्रश्नावलीचा उपयोग करण्यात आला. यामध्ये एकूण १० प्रश्नांचा समावेश करण्यात आला. हे १० प्रश्न शिक्षकांच्या बी.एड. अभ्यासक्रमातील सैद्धांतिक विषय, प्रात्यक्षिक कार्ये आणि अध्यापन प्रशिक्षणाशी संबंधित होते.

**१.१२ संख्याशास्त्रीय साधने**

प्रस्तुत संशोधनात संख्याशास्त्रीय साधन म्हणून शेकडेवारीचा उपयोग केला आहे. प्रश्नावलीतील प्रश्नाला दिलेल्या पर्यायांनाशेकडा किती टक्के शिक्षकांनी प्रतिसाद दिलायावरून त्याचे अर्थनिर्वचन करण्यात आले आणि अर्थनिर्वचनावर आधारित सदर संशोधनाचेनिष्कर्ष काढले आहेत.

**१.१३ संशोधनाची कार्यवाही**

- माहिती संकलनासाठी प्रासंगिक पद्धतीने नमुना म्हणून पाच वर्षाचा अध्यापन अनुभव असलेल्या २०शिक्षकांची निवड केली.

- माहिती संकलनाचे साधन म्हणून प्रश्नावली तयार करण्यात आली आणि ती ५ तज्ज्ञांकडून तपासून घेतली.
- नमुना म्हणून निवडलेल्या २० शिक्षकांकडून प्रश्नावली सोडवून घेतली.
- शिक्षकांकडून भरून घेतलेल्या प्रश्नावलीचे मूल्यमापन करण्यात आले.
- मूल्यमापन करून मिळालेल्या माहितीचे सारणीकरण करण्यात आले.
- प्रश्नावलीतील प्रत्येक विधानाला शेकडा किती शिक्षकांनी प्रतिसाद दिला याची नोंद केली.
- सदर निरीक्षणावरून अर्थनिर्वचन केले व अंतिम निष्कर्ष काढले.

**१.१४ संशोधनाचे निष्कर्ष**

- बी.एड. महाविद्यालयांमध्ये सराव पाठशाळांमधून घेतल्या जाणाऱ्या सराव पाठांची संख्या ही संपूर्ण कोर्समध्ये प्रत्येक विषयासाठी दोन पुरेशी आहे.
- बी.एड. महाविद्यालयांमध्ये किमान सलग दोन महिने फक्त अध्यापनाचे प्रशिक्षण आणि सराव देण्यात यावे.
- अध्यापनाचे दोन महिन्याचे हे प्रशिक्षण प्रत्यक्ष शाळांमध्ये देण्याऐवजी बी.एड. च्या तज्ज्ञ शिक्षकांच्या उपस्थितीत बी.एड. मधील सहकारी विद्यार्थ्यांसमोरच देण्यात यावे.
- शेवटच्या दोन महिन्याच्या या अध्यापन प्रशिक्षणात नवनवीन पद्धती आणि अध्यापनातील नवनवीन प्रयोग या बाबींचाच समावेश व्हावा.
- सैद्धांतिक विषयापैकी शैक्षणिक मानसशास्त्र या विषयाची प्रात्यक्षिके अधिक असावीत आणि हा विषयही अधिक विस्तृत पद्धतीने शिकविला जावा.
- प्रत्येक विषयाचे प्रात्यक्षिक हे वैयक्ति न करता गटामध्ये करण्याची परवानगी द्यावी.
- प्रत्यक्ष प्रात्यक्षिक करण्यापूर्वी प्रत्येक प्रात्यक्षिकांचा डेमा दिला जावा आणि त्याचा एकदा सराव करून घेतला जावा.

**१.१५ संदर्भसूची**

*चव्हाण, दी. व मुळे, सं. (२०१०). शैक्षणिक संशोधन आराखडा. नाशिक: इनसाइट पब्लिकेशन्स.*

*बर्वे, बी. (२०१०). जीवनमानाचे मानसशास्त्र. नागपूर: विद्या प्रकाशन.*

*मोशेरे, बी.डी. (२०१४). बी.एड्. महाविद्यालयीन शिक्षकांना सदर अभ्यासक्रम राबविताना तोंड द्याव्या लागणाऱ्या आव्हानांचा अभ्यास करणे. राष्ट्रीय परीषदेमध्ये सादर केलेला संशोधन लेख.*

*मोशेरे, बी.डी. (२०१४). एन.सी.टी.ई. रेग्युलेशन २०१४ नुसार बी.एड. कोर्समध्ये झालेल्या बदलामुळे बी. एड. महाविद्यालयांसमोर निर्माण झालेल्या समस्यांचा अभ्यास*

*राष्ट्रीय परीषदेमध्ये सादर केलेला संशोधन लेख.*

*मुळे, स. (२०११). शैक्षणिक संशोधनाची ओळख. नाशिक: इनसाइट पब्लिकेशन्स.*

*नानकर, प्र. व शिरोळे, सं. (२००९). वर्तमान शिक्षणातील विचारप्रवाह. पुणे: नित्यनूतन प्रकाशन*

*करंदीकर, सु. (२००६). शैक्षणिक मानसशास्त्र (सहावी आवृत्ती). कोल्हापूर फडके प्रकाशन.*

*चव्हाण, दि. के. (२००६). महाविद्यालयीन अध्यापक. नाशिक: इनसाइट पब्लिकेशन्स.*